**<u>ठळक बातम्या</u>**

- कायदेमंडळ, मंत्रिमंडळ आणि न्यायपालिका या प्रशासनाच्या तिन्ही स्तंभांनी एकमेकांविरुद्ध काम करू नये, असं सरन्यायाधीशाचं प्रतिपादन
- राज्यातल्या पाच समुद्र किनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं ब्लू फ्लॅग मानांकन प्रमाणपत्र
- महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना ऑस्ट्रेलिया बरोबर
- भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यानच्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात वेस्ट इंडिजवर फॉलो ऑनची नामुष्की

**आणि**

- ऑस्कर विजेती अभिनेत्री डायन कीटन यांचं कॅलिफोर्नियामध्ये निधन

**<><><><><>**

कायदेमंडळ, मंत्रिमंडळ आणि न्यायपालिका हे प्रशासनाचे तिन्ही स्तंभ देशाच्या नागरिकांना न्याय देण्यासाठीच काम करतात, त्यांचं अधिकारक्षेत्र स्वतंत्र असलं, तरी त्यांनी एकमेकांच्या विरोधात काम करू नये, असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आज केलं. रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगड इथं दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाचं उद्घाटन न्यायमूर्ती गवई यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. गेल्या काही काळात न्यायपालिकेच्या विविध पायाभूत सुविधांच्या विकासात राज्य सरकारची भूमिका मोठी आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

मंडणगडचं नवं न्यायालय हे सुमारे चार ते साडेचार लाख लोकांना मध्यवर्ती पडेल, त्यामुळे त्यांचा प्रवास आणि पैसे वाचतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या न्यायालयाद्वारे फक्त इमारत नाही, तर न्यायदानाची गतिशील व्यवस्था तयार झाल्याचं ते म्हणाले. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं मूळ गाव ज्या मंडणगड तालुक्यात आहे, तिथं न्यायालय उभं राहणं, हा बाबासाहेबांच्या वारशाचा गौरव आहे, अशी ग्वाही मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी दिली.

राज्यात अनेक ठिकाणी नवी न्यायालयं बांधली जात असून न्यायपालिकेचं नेतृत्व आणि शासनाची इच्छाशक्ती एकत्र आली, की न्याय नागरिकांच्या दारी पोहोचतो, असं मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडलं. राज्याचे उद्योगमंत्री आणि रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत, कोल्हापूर सर्किट बेंचचे मुख्य प्रशासकीय न्यायाधीश न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, बार असोसिएशनचे सदस्य आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

राज्यातल्या पाच समुद्र किनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं ब्लू फ्लॅग मानांकन प्रमाणपत्र मिळालं आहे. या यादीत रायगड जिल्ह्यातल्या श्रीवर्धन आणि नागावसह, पालघरमधल्या पर्णका, तसंच रत्नागिरी जिल्ह्यातल्या गुहागर आणि लाडघर या किनाऱ्यांचा समावेश आहे. महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत माहिती जाहीर केली. जागतिक स्तरावर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक समुद्र किनाऱ्यांना डेन्मार्कच्या फाऊंडेशन फॉर एन्व्हायरन्मेंटल एज्युकेशन संस्थेकडून ३३ निकषांच्या मूल्यमापनातून हे मानांकन दिलं जातं. पर्यावरण शिक्षण, पाण्याची गुणवत्ता, सुरक्षा आणि पर्यावरण व्यवस्थापन यांसह सेवा- सुरक्षा या घटकांचा यात समावेश असतो.

<><><><><>

डॉक्टर जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम राबवण्यासाठी राज्य शासनाने खान अकॅडमीशी सामंजस्य करार केला आहे. याचा लाभ ५० लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना होणार आहे. या कार्यक्रमांतर्गत २०२५-२६ मध्ये राज्यातील सुमारे ६२ हजारांहून अधिक जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीसाठी खान अकॅडमीची जागतिक दर्जाची आणि महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रमाशी संलग्न असणारी गणित आणि विज्ञान विषयक शैक्षणिक सामग्री अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत समाविष्ट केली जाईल. ही शैक्षणिक सामग्री मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध असेल. चित्रफितीचा वापर करून अभ्यास केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट व्हायला मदत होईल.

**<><><><><>**

औंध इथल्या वस्तू संग्रहालयाच्या जतन आणि संवर्धनासाठी राज्य सरकारने ५२ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर केला आहे. पर्यावरणाचा समतोल राखून, ऐतिहासिक वारसा जपत संग्रहालयाचं नूतनीकरण केलं जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ८५ व्या औंध संगीत महोत्सवात आज दिली.

**<><><><><>**

एनएसजी, अर्थात राष्ट्रीय सुरक्षा रक्षकांच्या २६व्या विशेष तुकडीनं आज मुंबईत २००८मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले मेजर संदीप उन्नीकृष्णन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सायक्लोथॉन आयोजित केली होती. ‘एनएसजी’ च्या स्थापना दिनाची औपचारिक सुरुवात करून, गर्भाशय मुखाच्या कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण करणं आणि ‘फिट इंडिया’ चळवळीला प्रोत्साहन देणं, हे या सायक्लोथॉनचं उद्दिष्ट आहे. एनएसजीच्या या उपक्रमात अडीचशेपेक्षा जास्त व्यावसायिक सायकलस्वार सहभागी झाले होते.

**<><><><><>**

मुंबईतल्या मेट्रो मार्गिका ७ आणि ९ च्या एकत्रीकरणासाठी १२ ते १८ ऑक्टोबर दरम्यान दहिसर पूर्व ते डी. एन नगर मेट्रो २ ए आणि गुंदवली ते ओवरीपाडा मेट्रो ७ या मार्गांवरच्या वेळापत्रकात तात्पुरता बदल केला आहे. आजपासून १८ तारखेपर्यंत या दोन्ही मार्गावरच्या सकाळच्या मेट्रो सेवा नेहमीपेक्षा थोड्या उशिरानं सुरू होतील. प्रवाशांनी प्रवासाचं नियोजन करताना महा मुंबई मेट्रोचं अद्ययावत वेळापत्रक तपासण्याचं आवाहन केलं आहे.

<><><><><>

आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना ऑस्ट्रेलिया बरोबर विशाखापट्टणम इथं होत आहे. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या बिनबाद ५ धावा झाल्या होत्या. काल रात्री, कोलंबो इथल्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या सामन्यात इंग्लंडने श्रीलंकेचा ८९ धावांनी पराभव करून स्पर्धेत सलग तिसरा विजय नोंदवला.

<><><><><>

भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान नवी दिल्लीत सुरू असलेल्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडिजवर फॉलोऑनची नामुष्की आली. कुलदीप यादव याच्या भेदक माऱ्यामुळे वेस्ट इंडिजला पहिल्या डावात फक्त २४८ धावा करता आल्या.

तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी कालच्या चार गडी बाद १४० या धावसंख्येवरून खेळायला सुरुवात केली. रविंद्र जडेजानं तीन तर जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी एक गडी बाद केले.

भारतानं पहिल्या डावात कर्णधार शुभमन गिल नाबाद १२९ आणि यशस्वी जयस्वाच्या १७५ धावांच्या बळावर पाच गड्यांच्या मोबदल्यात ५१८ धावांवर डाव घोषित केला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा वेस्ट इंडिजच्या २ बाद ९० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

ऑस्कर विजेती अभिनेत्री डायन कीटन यांचं काल कॅलिफोर्नियामध्ये निधन झालं. त्या ७९ वर्षांच्या होत्या. १९७७ सालच्या ‘ॲनी हॉल’ या चित्रपटातली ऑस्कर पुरस्कार विजेती भूमिका आणि ‘द गॉडफादर’ या चित्रपटातली त्यांची भूमिका प्रेक्षकांच्या स्मरणात राहिली. कीटन यांनी ६०पेक्षा जास्त चित्रपटांमध्ये काम केलं होतं. २०२४ मध्ये प्रदर्शित झालेला ‘समर कॅम्प’ हा त्यांचा शेवटचा चित्रपट होता. कीटन यांनी काही चित्रपटांचं दिग्दर्शनही केलं होतं. यामध्ये १९९५ सालच्या 'अनस्ट्रंग हिरोज' या चित्रपटाची कॅन चित्रपट महोत्सवातल्या 'अन सर्टन रिगार्ड' श्रेणीमध्ये निवड झाली होती.

**<><><><><>**

बुलढाणा जिल्ह्यात चांदी खरेदीसाठी प्रसिद्ध असलेल्या खामगाव शहरात गेल्या २ दिवसांत चांदीचा भाव ३० हजारांनी वधारला आहे. चांदी खरेदीची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली असून आता १ किलो चांदी खरेदीसाठी ग्राहकांना १ लाख ७२ हजार रुपये मोजावे लागत आहेत.

**<><><><><>**

सणासुदीच्या दिवसांमध्ये बाजारात कृत्रिम फुलांची विक्री वाढल्यामुळे नैसर्गिक फुलशेती करणारा शेतकरी उध्वस्त होण्याची भीती निर्माण झाली आहे. तसंच कृत्रिम फुलांमुळे होणारी पर्यावरणाची हानी लक्षात घेता, महापालिका प्रशासन आणि प्रदूषण नियंत्रण मंडळानं यावर निर्बंध आणावेत, अशी मागणी सोलापूर जिल्ह्यातले

शेतकरी आणि पर्यावरण प्रेमी नागरिकांनी केली आहे. कृत्रिम फुलांना कायमस्वरूपी बंदी घालावी, अशी मागणी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे केली होती. याबाबतच्या शासन निर्णयाची प्रतीक्षा आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधल्या मतदार यादीत नोंद असलेले शंभर वर्षांचे किंवा शंभरी पार केलेले जवळपास अर्ध्याहून अधिक मतदार हे मृत असल्याचं निवडणूक आयोगाच्या प्राथमिक तपासात समोर आलं आहे. ही संख्या किती आहे हे मतदारयाद्यांचं सखोल पुनरीक्षण झाल्यावरच स्पष्ट होईल असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. सध्या पश्चिम बंगालमधल्या मतदार यादीत शंभरी पार केलेल्या १३ हजार मतदारांची नोंद आहे. पश्चिम बंगालमधे लवकरच सखोल पुनरीक्षण सुरू होईल, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**